## <u>निशाणी क्र. ७३ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ व नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**<u>वादीचे थोडक्यात कथन असे की</u>,**

०२. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटणी करून जमिनीचा ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १२ विमलबाई साहेबराव बनसोडे असे झालेले आहे. परंतु, प्रत्यक्षात त्यांचे नाव चंद्रभागाबाई साहेबराव भोंडे असे आहे. त्यामुळे अर्जात नमुद दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेविषयी आक्षेप नोंदविला आहे.

०४. अर्ज त्यावरील शपथपत्र, प्रतिवादी यांचे म्हणणे यांचे अवलोकन करुन वादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यामध्ये अर्जात नमूद दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादी मधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

### <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी निशाणी क्र. ७३ वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी व तशी दावा दुरुस्तीची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी.

०३. वादी यांनी सदर अर्जाचा खर्च रक्कम रूपये २००/– (दोनशे रूपये) प्रतिवादी यांना द्यावा.

स्वाक्षरित/–
(आर. व्ही. पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन.

दिनांकः १०.०१.२०२४.
भोकरदन.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे

न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन

मा. साहेबांनी चेक केले

व पी.डी.एफ. दिनांकः १०.०१.२०२४.

स्वाक्षरित/–

लघुलेखकाची सही